डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in


जा.क्र : बार्टी/सीव्हीसी विभाग/कार्या-१४/२०२५-२६/ **६०६६** दिनांक:-१०.०९.२०२५

## जाहीर आवाहन

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता घेण्यात येणाऱ्या विविध पदवी व पदव्युत्तर पदवी या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राखीव प्रवर्गामधून प्रवेशासाठी इच्छुक उमेदवारांना जात प्रमाणपत्र वैधता पडताळणी प्रक्रीयेबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (CET CELL) उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, कृषी शिक्षण, वैद्यकीय/आयुष शिक्षण आणि कला शिक्षण विभागाच्या विविध पदवी व पदव्युत्तर पदवी या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राखीव प्रवर्गामधून प्रवेशासाठी केंद्रभुत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आलेल्या आहेत. अभ्यासक्रमाच्या प्रवेश घेण्याच्या तारखा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून (CET CELL) जाहीर करण्यात आलेले आहेत.

**शासन निर्णय-महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग दि.२६ ऑगस्ट, २०२५ व शासन शुध्दीपत्रक-महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दि.०५ सप्टेंबर, २०२५ अन्वये, राज्यात सुरु असलेल्या सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यवसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग व एसईबीसी प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.**

त्याअनुषंगाने, CET CELL चे पात्र विद्यार्थी यांना त्रुटी पूर्तता करण्याबाबत Sms/ Email व पत्राव्दारे संबंधित समित्यांमार्फत कळविण्यात येऊनही अनेक अर्जदार/विद्यार्थी यांनी संबंधीत समित्यांशी संपर्क साधलेला दिसून येत नाही. अर्जाची त्रुटी पूर्तता करण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारांची आहे.

जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळणेपासून वंचित राहू नये याकरिता ज्या अर्जदार/विद्यार्थ्यांनी अद्यापही वैधता प्रमाणपत्राबाबत त्रुटींची पूर्तता केलेली नाही, त्यांनी संबंधीत जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी त्वरीत संपर्क साधावा व त्रुटींची पूर्तता करावी जेणेकरुन समितीला विहित वेळेत निर्णय घेता येईल असे आवाहन महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा मुख्य समन्वयक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या (सर्व) महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/-
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे तथा मुख्य समन्वयक,**
**जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या (सर्व),**
**महाराष्ट्र राज्य.**